# पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003

दुरध्वनी नंबर 0253-2309700

E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


**प्रेस नोट** दिनांक :- १५/०२/२०२५

## इगतपुरीतील मिस्टीक व्हॅली येथील न्युयॉर्क व्हिला वर नाशिक ग्रामीण पोलीसांचा छापा अवैधरित्या जुगार खेळणारे १८ इसामांसह व्हिला मालकावर कारवाई

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील अवैध व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे आदेशान्वये पोलीस ठाणे निहाय कारवाई करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर यांनी स्वत: इगतपुरी तालुक्यातील तळेगाव शिवारात एका व्हिलामध्ये छापा टाकुन अवैधरित्या जुगार खेळणारे १८ इसमांवर कारवाई केली आहे.

इगतपुरी पोलीस ठाणे हद्दीत तळेगाव शिवारात, मिस्टीक व्हॅली या ठिकाणी असलेल्या न्युयॉर्क व्हिलामध्ये काही इसम अनधिकृतपणे एकत्रित येवुन ५२ पानी पत्त्यांवर रोख रक्कम लावुन जुगार खेळत असल्याची गोपनीय बातमी अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांना मिळाली होती. बातमीप्रमाणे दि. १५/०२/२०२५ रोजी मध्यरात्रीचे सुमारास अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांनी स्वत: त्यांचे पथकांसह सदर ठिकाणी छापा टाकुन कारवाई केली आहे. सदर कारवाईत अवैधरित्या जुगार खेळणारे व खेळविणारे खालील इसमांना ताब्यात घेण्यात आले आहे.

१) दत्ता किसन नवले, रा. पाथर्डी फाटा, नाशिक, २) महादेव गुलाबराव खवणे, रा. खुटवडनगर, सिडको नाशिक, ३) श्रेयस सतिष श्रीवास्तव, रा. मीरारोड, मुंबई, ४) दिनकर योगेश्वर कपुर, रा. वसई, मुंबई, ५) आमीन चंद्रावर, रा. मीरारोड, मुंबई, ६) हितेश भिकु तनवडे, रा. कांदीवली पुर्व, मुंबई, ७) आनंद प्रकाश सरोज, रा. वाघली, ठाणे, ८) अविनाश रमेश शिपाई, रा. वाघली, ठाणे, ९) शिवाजी सुर्यभान मंदारे, रा. पवननगर, नाशिक, १०) अतुल चंद्रकांत रावल, रा. शिळफाटा, ठाणे, ११) संतोष रामभाउ मुळे, रा. त्रिमुर्ती चौक, नाशिक, १२) अमर बहादुर टंडन, रा. नेपाळ, १३) सतिष रामचंद्र पांडे, रा. डोंबिवली, ठाणे, १४) अभिषेक लक्ष्मीकांत कश्यप, रा. इटा, उत्तरप्रदेश, १५) राजेश गणेश जिवाणी, रा. व्दारका, नाशिक, १६) कल्पेश रामजीभाई गोजरीया, रा. सिडको, नाशिक, १७) यशकुमार उर्फ शेरासिंग भगतसिंग, मॅनेजर, न्युयॉर्क व्हिला, मुळ रा. सांताक्रुज पश्चिम, मुंबई, १८) सुरेश काळु सदगीर, रा. गायकवाड नगर, इगतपुरी

सदर छापा कारवाईत वरील इसमांना अवैधरित्या जुगार खेळतांना व खेळवितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांचे कब्जातुन भारतीय चलनी नोटा रोख ६,७२,९७० रुपये, नेपाळ देशाच्या चलनी नोटा रोख ७०,७२० रुपये, जुगार खेळण्यासाठी लागरणारे साहित्य साधने, ५२ पानी पत्त्यांचे कॅट, तसेच ३५,७६० रू. किंमचे देशी व विदेशी मद्य, चारचाकी वाहने त्यात बीएमडब्ल्यु, दोन हुन्डाई क्रेटा, मारूती स्विफ्ट अशी ०४ वाहने असा एकुण १८,७९,४५० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

यातील न्युयॉर्क व्हिलाचे मॅनेजर यशकुमार उर्फ शेरासिंग भगतसिंग यांना सदर व्हिला कोणाचे मालकीचा आहे याबाबत विचारणा केली असता, सदर न्युयॉर्क व्हिला हा शक्ती ढोलकिया, रा. जुहू तारारोड, सांताक्रुज पश्चिम, मुंबई यांचे मालकीचा असल्याचे सांगितले आहे.

यातील मिस्टीक व्हॅली परिसरातील न्युयॉर्क व्हिला येथुन ताब्यात घेतलेले वरील १८ इसम हे विनापरवाना अवैधरित्या स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी तीन पत्ती नावाचे जुगारावर पैसे लावुन जुगार खेळतांना व खेळवितांना मिळुन आले असून सदर ठिकाणावर अवैध देशी-विदेशी मद्य देखील मिळुन आले आहे. तसेच यातील व्हिला मालकाने जुगार खेळण्यासाठी जागा भाडे तत्वावर उपलब्ध करून दिल्याने, वरील सर्व आरोपी क्र. १ ते १८ व व्हिला मालक यांचेविरूध्द इगतपुरी पोलीस ठाणे येथे मुंबई जुगार कायदा कलम ४ व ५, तसेच महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, इगतपुरी पो.स्टे.चे पोनि राहुल तसरे, तसेच पथकातील सपोनि पुष्पा आरणे, पोलीस अंमलदार मयुर कांगणे, योगेश्वर तनपुरे, निलेश देवराज, शुभम गुरव, किरण आहेर, पंकज दोंदे, सुनिल जगताप, संदेश भिसे, किशोर वाघेरे, मेघा कातकाडे यांचे पथकाने सदरची कारवाई केली आहे.